मंत्रीमंडळावर लोकसभेचे नियंत्रण - एक अवलोकन

प्रा. डॉ. चंद्रशेखर ढोले
राज्यशास्त्र विभाग प्रमुख,
शिवजागृती महाविद्यालय, नळेगाव

संसदीय शासनपध्दतीमध्ये मंत्री मंडळ हे वास्तविक शासन संस्था असून ते शासनकारभारासाठी लोकप्रतिनिधिक सभागृहास जबाबदार असते. राज्यघटनेच्या कलम 75 (3) नुसार - ''मंत्रीमंडळ हे सामूहिकरित्या लोकसभेला जबाबदार असते.'' हे मंत्रीमंडळ लोकसभेचा विश्वास असेपर्यंत अधिकारपदावर असते. लोकसभा मंत्रिमंडळावर पुढील मार्गांनी नियंत्रण ठेवते.

सरकारच्या कारभाराविषयी प्रश्न विचारणे :-

लोकसभेतील सदस्य संसदेच्या अधिवेशनादरम्यान मंत्रीमंडळाला सरकारच्या कारभाराविषयी अनेक प्रश्न विचारतात व त्यांना तोंडी अथवा लेखी (स्वरूपानुसार) उत्तर देण्याचे मंत्रिमंडळावर बंधनकारक असते. ठराविक मुदतीच्या आत प्रश्नास उत्तर द्यावे लागते.

संसद सदस्यांचे विशेषाधिकार :-

1. प्रत्येक प्रश्नाचे समाधानकारक उत्तर मिळवणे.
2. पूरक प्रश्न आवश्यकतेनुसार विचारणे.
3. सार्वजनिक महत्वाचा प्रश्नांवर आकडेवारीसह मंत्रिमंडळाने उत्तर देण्याबाबत मागणी करणे.

सरकारच्या धोरण-नीतिसंदर्भात विरोधीपक्षाची भूमिका :-

1. लोकसभेत विरोधी पक्ष शासनाच्या धोरण व नीतिसंदर्भात सातत्याने टीका करून सरकारला आपले धोरण व नितीसंदर्भात भूमिका स्पष्ट करण्यास भाग पडतो.
2. राष्ट्रपतीच्या अभिभाषणावर धन्यवाद प्रस्ताव ठराव संमत करण्याअगोदर विरोधी सदस्यांच्या या अभिभाषणातील मुद्यांवर विचारलेल्या प्रश्नांना योग्य उत्तरे देण्याची सरकारची जबाबदारी असते.
3. जर विरोधी पक्षाचे बहुमत सिध्द झाले तर म्हणजेच राष्ट्रपतीच्या अभिभाषणासंबंधी धन्यवाद ठराव असंमत झाल्यास मंत्रीमंडळावर लोकसभेचा अविश्वास असल्याचे मानण्यात येते. उदा. जानेवारी 1980 मध्ये राष्ट्रपतींच्या अभिभाषण ठरावावर विरोधी पक्षांनी सुचवलेल्या दुरूस्तीस 80 वि. 75 मतांनी संमती देण्यात आली व दुरूस्तीसह आभार प्रदर्शन ठराव पारित होण्याचा इतिहास घडला.

शासनाचा नैतिक पराभव :-

ज्यावेळेस सत्तारूढ पक्षाचे बहुमत असते तरीही गैरसरकारी सदस्याने मांडलेल्या विधेयकास लोकसभेची संमती मिळाली तर सरकारचा नैतिक पराभव मानला जातो. त्यातून सरकारला आपल्या अपयशी धोरणाची अथवा दुष्कृत्याची जाणीव होत असते.

सरकारच्या अयोग्य कारभारावर इशारा :-

कोणत्याही स्वरूपाच्या शासकीय ठराव/प्रस्तावास लोकसभेने नामंजूर करणे म्हणजे मंत्रीमंडळ/शासनाच्या घटनाबाह्य कारभारास/कार्यास दिलेला तो इशाराच असतो.

काम-रोको प्रस्ताव :-

एखद्या विशिष्ट परिस्थितीत निर्माण झालेल्या प्रश्नांसंबंधी/दुर्घटनेसंबंधी लोकसभेत चालू असलेल्या प्रश्नावरील चर्चा बंद करून वरील उद्‌भवलेल्या झालेल्या प्रश्न अथवा दुर्घटनेवर चर्चा करण्याबाबत लोकसभा सदस्य आग्रह धरतात. यास काम-रोको प्रस्ताव म्हणतात. सभापतीने असा ठराव मान्य केल्यास संबंधित प्रश्नांची उत्तरे देणे अवघड जाते.

सदस्याचा सभात्याग :-

ज्यावेळेस विरोधी पक्षाने विचारलेल्या प्रश्नाला मंत्रीमंडळाद्वारे योग्य उत्तरे मिळत नसतील अथवा उत्तरे देण्यास टाळाटाळ होत आहे असे विरोधी पक्षास निदर्शनास आले तर विरोधी पक्ष सरकारचा निषेध करून सभागृहाचा त्याग करतात अथवा उत्तराची मागणी करताना सभागृहात आरडाओरड, गोंधळ माजवतात. पर्यायाने सभागृहाचे कामकाज बंद पडते. याचा परिणाम लोकजागृतीसाठी होतो.

सार्वजनिक महत्वाच्या प्रश्न व विषयाकडे सरकारचे लक्ष वेधणे :-

अत्यावश्यक महत्वाच्या प्रश्न-विषयासंबंधी त्वरित विचार होण्यासाठी अथवा काही वेळानंतर तो विषय विचारार्थ घेण्याचा आग्रह विरोधी पक्षाचे सदस्य ज्यावेळेस करतात, त्यामागील उद्देश संबंधित प्रश्नावर सरकारने लक्ष केंद्रित करावे हा असतो. उदा. पीएनबी घोटाळा

निंदा व्यंजक ठराव :-

लोकसभेत विरोधी पक्ष संघटित असल्यास मंत्र्याच्या बेकायदेशीर कृत्यावर, त्याच्यावर अथवा संपूर्ण मंत्रिमंडळावर निंदाव्यंजक ठराव मांडतात. हा ठराव संमत झाल्यास संपूर्ण मंत्रिमंडळास राजीनामा द्यावा लागतो.

शासनाच्या दुष्कृत्यावर कडक टीका :-

लोकसभा सदस्य मंत्रीमंडळाच्या दुष्कृत्यावर सभागृहात अथवा सभागृहाबाहेर कडक टीका करून सरकारचे अपयश जनतेसमोर निदर्शनास आणतात. त्यातून जनतेत जागृती होण्यास मदत होणे व या टीकेकडे जर सरकारने जाणूनबुजून दुर्लक्ष केले तर मात्र त्याचा परिणाम नजिकच्या सार्वत्रिक निवडणूकांमध्ये दिसून येतो. सरकारच्या पक्षास पराभवास सामोरे जावे लागते. उदा. मनमोहनसिंह सरकारच्या काळात 2 जी स्कॅम आणि सध्याचा पीएनबी घोटाळा.

वित्तीय नियंत्रण :-

मंत्रीमंडळाद्वारे प्रतिवर्षी मांडण्यात येणाऱ्या अंदाजपत्रकावर अथवा पुरवणी अंदाजपत्रकावर विरोधी पक्षाद्वारे प्रखर टीका केली जाते. जर लोकसभेने अंदाजपत्रकात कपात करणे अथवा संपूर्ण अंदाजपत्रक अमान्य केले तर लोकसभेचा मंत्रिमंडळावर अविश्वास मानला जातो व जर लोकसभेने अंदाजपत्रक फेटाळले तर परिणामी मंत्रिमंडळास तत्काळ राजीनामा द्यावा लागतो.

मंत्रीमंडळावर अविश्वासाचा ठराव :-

मंत्रिमंडळ लोकसभेला जबाबदार असून ते आपल्या शासनकारभाराबाबत लोकसभेलाच जबाबदार असल्याचा ठराव मंजूर झाल्यास मंत्रिमंडळ तत्काळ पदच्युत होते. मात्र असा ठराव सहजासहजी संमत होणे शक्य नसते. जर सत्तारूढ पक्षातील काही सदस्य तटस्थ राहिले अथवा विरोधी पक्षास मिळाले तर विरोधी पक्षाद्वारे मांडलेला अविश्वासाचा ठराव संमत होऊ शकतो. विरोधी पक्षाच्या सतत होणाऱ्या टीकेमुळे पंतप्रधान राष्ट्रपतीस लोकसभा बरखास्त करण्याची व मुदतपूर्व निवडणूका घेण्याची विनंती करू शकतो. अविश्वासाच्या ठरावास दुधारी शस्त्र मानले जाते. उदा. नरेंद्र मोदी सरकारवर 19 मार्च 2018 रोजी आलेला अविश्वास.

वित्तीय नियंत्रण :-

अर्थसंकल्प तयार करण्याचा अधिकार अर्थमंत्र्याना व मंत्रीमंडळाला आहे. अंदाजित उत्पन्न व खर्च यांचे वार्षिक विवरण संसदेपुढे ठेवण्याची तरतुद भारतीय राज्यघटनेने करण्यात आली आहे. वित्तिय संदर्भात सरकार पुढाकार घेत असतो. असे असले तरी कर आकारण्याचे व कर कमीजास्त करण्याचे व पुरवठा आणि मागणीवर मतदान करण्याचे अधिकार संसदेकडे आहे.

विरोधी पक्ष नेता :-

संसदेच्या दोन्ही सभागृहात विरोधी पक्ष नेता असतो या संदर्भात ज्या राजकीय पक्षाला सभागृहाच्या 1/10 जागापेक्षा कमी जागा नसतील त्या पक्षास विरोध पक्ष म्हणतात आणि त्याच पक्षाच्या नेत्यास विरोधी पक्षनेत्या असे म्हणतात. विरोधी पक्ष नेता सरकारच्या चुकीच्या निर्णयाला विरोध करतात आणि टिका करतात ही टीका संसदेत आणि संसदेबाहेर केली जाते.

तारांकित प्रश्न :-

तारांकित प्रश्न विचारण्यासाठी 10 दिवस अगोदर सुचना द्यावी लागते. अशा प्रश्नांचे लेखी उत्तर द्यावे लागते.

अल्पसुचना :-

असा प्रश्न विचारण्यासाठी सदस्यांना 10 दिवस अगोदर सुचना द्यावी लागते या प्रश्नांचे पण लेखी उत्तर द्यावे लागते.

शून्य प्रहर :-

प्रश्नोत्तरांचा तास संपताच दुपारी बरोबर 12.00 वाजता शुन्य तास सुरू होतो. यावेळी सभागृहाचे सदस्य कोणताही विषय किंवा प्रश्न मांडू शकतात त्यासाठी पुर्वसूचनेची आवश्यकता नसते.

स्थगन प्रस्ताव :-

हे भारतीय संसदेतील सर्वात प्रभावी असे नियंत्रणाचे आयुध आहे. स्थगन प्रस्ताव मांडायचा असेल तर त्यादिवशी सभागृहाचे कामकाज सुरू होण्यापुर्वी एक तास आधी म्हणजे सकाळी ठिक 10.00 वाजता सभागृहाच्या महासचिवाकडे सुचना द्यावी लागते.

लक्षवेधी सुचना :-

लक्षवेधी सुचनेसाठी सभागृहाच्या सभापतीची पुर्व परवानगी घेणे आवश्यक आहे. एकदिवस आधी सूचना द्यावी लागते.

हक्कभंग प्रस्ताव :-

एखाद्या मंत्र्याने सभागृहात चुकीची किंवा अर्धवट माहिती दिली असेल असे लक्षात आल्यात संसदेचे सदस्य त्या मंत्र्याविरूध्द हक्कभंग प्रस्ताव मांडतात.

निंदाव्यंजक ठराव :-

जबाबदारीचे योग्य पध्दतीने पालन न केल्यास हा प्रस्ताव मांडला जातो. व्यक्तिगत मंत्री, मंत्र्याचा गट किंवा संपूर्ण मंत्रीमंडळाच्या विरोधात निंदाव्यंजक ठराव मांडला जातो. सरकारचे किंवा मंत्र्याचे अपयश दर्शविण्यासाठी हा ठराव महत्वाचा आहे. हा ठराव पास झाल्यास मंत्रीमंडळाला राजीनामा द्यावा लागतो.

निष्कर्ष :-

भारतीय संसदीय लोकशाहीमध्ये संसदेवर प्रभावी नियंत्रण ठेवण्यासाठी अनेक संसदीय आयुधे वापरले जातात. यामुळे सत्ताधारी पक्ष संसदीय मुल्यांचे व नियमांचे पालन करत असते. सरकारला या मुल्यांची आणि नियमांची भिती असते. अशा नियंत्रणामुळे शासनाला लहरी प्रमाणे व एकाधिकार शाहीने राजकारभार करता येत नाही. सक्षम असा विरोधी पक्ष आणि विरोधी पक्षनेता असेल तर निश्चितच कार्यकारी मंडळावर अंकुश राहतो. विरोधी पक्ष वेगवेगळया मार्गाने सरकारवर नियंत्रण ठेवत असते. विरोधकांचा आवाज संसदीय लोकशाहीत दाबला जात नाही हे अतिशय महत्वाचे आहे.

संदर्भ ग्रंथ :-

1. र. घ. वराडकर - भारतीय राजकीय व्यवस्था, निराली प्रकाशन, पुणे
2. सुभाष सी. कश्यप - आपली संसद, नॅशनल बुक ट्रस्ट, नवी दिल्ली.
3. भास्कर लक्ष्मण भोळे - राजकीय विश्लेषण, पिंपळापुरे बुक डिस्ट्रीब्यूटर्स, नागपूर
4. पां. श्री. घाटे - राज्यशास्त्र सिध्दांत आणि राज्ययंत्रणा, पुणे विद्यार्थीगृह प्रकाशन, पुणे